# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

**Website- www.sic.maharashtra.gov.in**

दुरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र. १४९/२०२५/धुळे

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.गणेश शालिक कोळी,<br>रा.प्लॉट नं.८९/२, साईबाबा मंदिराच्या मागे, निर्मल ऑइल मिल, जामनेर रोड, भुसावळ,जळगाव. | नायब तहसिलदार (निवडणुक),<br>तहसील कार्यालय, शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे. |

सुनावणी दिनांक १८/०३/२०२६

तक्रारदार यांनी दि. २७/०३/२०२५ रोजीच्या अर्जान्वये, "माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ६(१) प्रमाणे अर्ज दिला होता, जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे यांचेकडुन माहिती देण्यात आली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी दि. १२/०३/२०२५ रोजी पोस्टाद्वारे मला माहिती दिली की, मी मागीतलेली माहिती शिंदखेडा तहसिल कार्यालयाशी निगडीत आहे. ही माहिती पुरविण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी दि ३०/०१/२०२५ ते दि १२/०३/२०२५ पावेतोचा एकुण ४२ दिवसाचा कालावधी घेतला आहे. कायदयाचे ज्ञान असतांना कायदा कसा तुडवायचा हे सदर जनमाहिती अधिकारी दाखवत आहेत. एक जबाबदार पदावर काम करत असतांना, अशा प्रकारे माहिती मागीतल्यावर प्रशासनाकडुन गंमत केली जात आहे.उपरोधीक बाब म्हणजे जन माहिती अधिकारी धुळे यांनी संदर्भीय पत्र क्र २ दि १२/०२/२०२५ चे दाखवुन पोस्ट मात्र दि १२/०३/२०२५ रोजी केली आहे. सदर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य सचोटीने केले नाही. तसेच जन माहिती अधिकारी धुळे यांनी संदर्भीय पत्र क्र २ अन्वये तहसिल कार्यालय शिंदखेडा येथे पाठविले असल्याचे उल्लेख केला आहे. दि १२/०२/२०२५ पासून आजपावेतेएकुण ४५ दिवस झाले आहेत. परंतु, अद्यापावेतो सदर पत्राचे संदर्भान्वये शिंदखेडा तहसिल कार्यालयाकडुन देखील माहिती प्राप्त झालेली नाही. वरिल कार्यालय माहिती देण्यास बांधील असतांना व सदर कार्यालय एक जबाबदार कार्यालय असुन ते माहिती अधिकाराला कोणतेही किंमत देत नसल्याचे दिसत आहे. आपणास विनंती आहे की, सदर बाबत सज्ञान घेण्यात येवुन मला कायदयाने प्राप्त अधिकाराचे संरक्षण करण्यात येवुन मला आवश्यक माहिती पुरवण्यात यावी. व संबंधीतांवर कार्यवाही व्हावी." असे तक्रारदार यांनी नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ (१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०३/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित असुन विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. २३/०१/२०२३ रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

“१. मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी, धुळे यांचेकडील पत्र क्र ग/कक्ष - ११/ निवडणुक /कावी/२६१६/२०२४ दि. /११/२०२४ प्रत देण्यात यावी. तसेच या पत्रावर दिनांक का नमूद नाही बाबत माहिती दयावी. २. निवडणुक अधिकारी, शिंदखेडा विधानसभा मतदार तहसिल कार्यालय शिंदखेडा यांचेकडील जा.क्र. निवडणुक /कावी/८०१/२०२४ दि.१९/११/२०२४ प्रत देण्यात यावी. ३. उपविभागीय पोलिस अधिकारी, शिरपुर, पोलिस निरीक्षक शिंदखेडा व मतदान पेटी घेवुन जाणेकामी येणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांना प्रशिक्षण देतांना कोणत्या सुचना दिल्या होत्या, त्या सुचनांचे पत्रक/पत्र/आदेश प्रत प्रोसिडोंग बाबत माहिती देण्यात यावी. ४. पोलिस विभागाने दि.१९/११/२०२४ रोजी स्ट्रॉगरुमला देण्यात आलेला पोलिस बंदोबस्त दिला असल्यास, पोलिस विभागाकडुन बंदोबस्त आराखडा प्राप्त करण्यात आला असेल तर त्याची प्रत देण्यात यावी. ५. शिंदखेडा शहराकडुन दक्षिणेकडिल कुमरेज गावाकडे जाणारा रोड बंद केले बाबत अधिसुचना देण्यात आली असल्यास त्याची प्रत देण्यात यावी ६. शिदखेडा शहराकडुन दक्षिणेकडिल कुमरेज गावाकडे जाणारा रोड बंद केले बाबत अधिसुचना कोणत्या संपर्क माध्यमाद्वारे देण्यात आली होती. वर्तमानपत्राला सदर माहिती दिल्याचे आपल्या कार्यालयाचे पत्राची प्रत देण्यात यावी, कोणत्या वर्तमानपत्रात कोणत्या तारखेला सदर सुचना प्रकाशित करण्यात आली होती बाबत माहिती दयावी. ७. कुमरेजगावाकडुन उत्तरेकडिल शिंदखेडा शहराकडे जाणारा रोडवर शासकिय व अधीग्रहीत वाहने यांना यु-टर्न किती ठिकाणी दिला होता. ८. कुमरेजगावाकडुन उत्तरेकडिल शिंदखेडा शहराकडे जाणारा रोडवर शासकिय व अधीग्रहीत वाहने यांनी मेन गेटपर्यंत आल्यावर त्या वाहनांना यु-टर्न घेता यावा करिता, स्ट्रॉग रुमचे मुख्य गेटपासुन किती अंतरावर यु-टर्न देण्यात आला होता. ९. कुमरेजगावाकडुन उत्तरेकडिल शिंदखेडा शहराकडे जाणारा रोडची वेग मर्यादा, वाहन क्षमता, रुंदी रोडवर असलेले रोड सुरक्षा चिन्हाची संख्येबाबत माहिती मिळावी. सदर रस्ता वाहतुकीकरता सुरक्षीत होता अगर कसे बाबत आपल्या कार्यालयामार्फतीने रोडचे कामे करणाऱ्या संस्था प्राधिकरण/विभाग यासोबत पत्रव्यवहार केला असल्यास त्या पत्राचे प्रती मिळावी. १०. स्ट्रॉगरुम निश्चित करतांना, स्ट्रॉगरुम कोणत्या निकषांचे आधारे निश्चित केले बाबत माहिती मिळावी, स्ट्रॉग रुम निश्चित करतांना कोणत्या निकषांचे जी आर, आदेश, सुचना, निवडणुक आयोगाचे सुचना बाबत पत्रक प्रत दयावी. किती ठिकाणी निकष पाळण्यात आले नाही बाबत माहीती दयावी. ११. दि.१९/११/२०२४ रोजी पोलिस बंदोबस्त मा निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन म.पा.प्र.धुळे यांनी शिंदखेडा स्ट्रॉगरुमचे मेनगेट समोर वाहतुक कोंडी बघुन, पोलिस विभागातील बंदोबस्तकामी किती पोलिस अधिकारी बंदोबस्तला अनुपस्थीत असल्याचे दिसुन आले बाबत रिपोर्ट दिला होता बाबत माहिती दयावी. त्यांचे वर कोणती कार्यवाही आपण केली माहिती मिळावी. १२. दि.१९/११/२०२४ रोजी शिंदखेडा स्ट्रॉगरुम येथे मा. निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन म.पा.प्र.धुळे यांनी वाहतुक कोंडी बघुन मतदान पेटी वाटपाचे काम थांबवुन, पोलिस बंदोबस्त तपासणी केली असल्यास, त्यांनी आपल्या कर्तव्याचा चार्ज कोणत्या सक्षम अधिकारीकडे सोपवला होता. त्या अधिकारीचे नाव व हुद्दा बाबत माहिती मिळावी १३. शिंदखेडा स्ट्रॉगरुम येथे वरिल प्रमाणे वाहतुक कोंडी किती वेळ होती, वाहतुक कोंडी काढण्यात किती वेळ लागला होता, किती वाहने वाहतुक कोंडीमुळे प्रभावित झाली होती बाबत लेखी अहवाल प्रती मिळाव्या. १४. वाहनतळ देण्यात आला असतांना, वाहतुक नियंत्रणाचे आराखडे आपल्या निगराणीमध्ये नियोजनबद्ध केले असतांना, शासकिय, अधीग्रहीत वाहने व मतदान कर्मचारी यांची वाहन स्ट्रागरुमचे मेन गेटपर्यंत कोणाच्या आदेशाने आणली जात होती. सदर आदेश देण्या-या अधिकारी नाव व हुद्दा बाबत माहिती देण्यात यावी. १५. दि १९/११/२०२४ रोजी मा निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन म.पा.प्र. धुळे यांना ड्रेस कोड असावा का बाबत परिपत्रक / आदेश प्रत मिळावी. तसेच यांनी वाहतुक कोंडी बघुन, स्ट्रागरुमचे मेन गेटपर्यंत आले त्यावेळी ते ड्रेस कोड

मध्ये होते का. त्यांचेकडे असलेले आय कार्ड चे लांबी रुंदी माप किती होते ते किती अंतरावरुन सहज दिसु शकते बाबत माहिती दयावी. १६. मतदान प्रक्रियेकामी अधिग्रहीत वाहनांची चालकांचे पोलिस व्हेरिफिकेशन बाबत कागदपत्र देण्यात यावी किती चालकांवर प्रचलीत कायदयाने गुन्हे दाखल होती तसेच अधिग्रहीत वाहने फिटनेस प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले होते बाबत माहिती मिळावी. १७. शिंदखेडा शहराकडुन दक्षिणेकडिल कुमरेज गावाकडे जाणारा रोड हा कोणत्या प्रकारचा रोड होता या रोडवरुन वाहन जातांना उडणारी धुळ आरोग्यास हानिकारक नाही बाबत तपासणी करण्यात आली. बाबत माहिती मिळावी. १८. स्ट्रॉगरुमजवळ कचरा असल्यास त्यापासुन दुर्गंधी मानवी आरोग्यास योग्य असल्याबाबत तपासणी केल्याचे अहवाल प्रत मिळावी. १९. शिंदखेडा स्ट्रॉगरुम येथे मतपेटी घेणेकामी अधिकारी/ कर्मचारी (पोलिस विभाग वगळून) किती वाजेला यायची आदेश आपणा कडुन देण्यात आले होते. आदेशाची प्रत देण्यात यावी. २०. शिंदखेडा स्ट्रॉगरुम येथे बंदोबस्तकामी पोलिस विभाग अधिकारी/ कर्मचारी किती वाजेला यायची आदेश आपणा कडुन देण्यात आले होते. किती अधिकारी/ कर्मचारी उशिरा आले त्यांचेवर काय कार्यवाही कारण्यात आली. २१. शिंदखेडा स्ट्रॉगरुम येथे मतपेटी घेणेकामी अधिकारी/कर्मचारी (पोलिस विभाग वगळून) किती वाजेला पोलिंग बुध ला पोहचली होती. कोणती गावाचे पोलिंग बुध मतपेटी घेणेकामी अधिकारी/ कर्मचारी पोहचले नाही अथवा त्यांना उशिर झाला त्या गावाची नावे, त्या उशिरा पोहचणा-या मतपेटी घेणेकामी अधिकारी/ कर्मचारी नावे, संपर्क पत्त्यासह देण्यात यावी. २२. मुद्दा क्र २१ मधील उशिर झालेला गावाची मध्ये आपण नेमलेल्या सेक्टर ऑफिसरचे मतदान कर्मचारी अधिकारी यांची टिम उशिरा पोहचल्याचे अहवाल देण्यात यावे"

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांचा दि.२३/०१/२०२३ चा माहिती अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महसूल अधिकारी (निवडणूक शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, निवडणुक तहसिल कार्यालय, ८-शिंदेखेडा विधानसभा मतदार संघ, यांचेकडे दि.१२/०२/२०२५ अन्वये वर्ग केल्याचे दिसून येते. त्यामूळे तक्रारदार यांनी त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांना तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात प्रतिवादी देखील केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर तक्रार पूढील चौकशी योग्य नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तूत तक्रार क्र.१४९/२०२५/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

---

जा.क्र. ३३५८ दि. ०८/०४/२०२६

---